**एम ए सी पी क्र.८२/२०२२**
**नि.क्र.२१**

**<u>पुढील सरतपास शपथेवर सुरू के. पे. झावरे वकील साहेब</u> :**

मी नि.३ लगत एफ आय आर, जबाब, पंचनामा, आर सी बुक, विमा पॉलीसी कव्हर, लायसन्स, इन्जुरी सर्टीफिकेट व फॉर्म नं.बी दाखल केले आहे. फॉर्म नं.बी मध्ये नमुद अपंगत्वाचे प्रमाण सामनेवाला क्र.३ नाकारत असुन त्यांचा सदरचा आक्षेप रेकॉर्डवर ठेवुन फॉर्म नं.बी ला **<u>नि.क्र.२६</u>** देण्यात येत आहे. इतर पोलीस पेपरला **नि.क्र.२७ ते ३३** देण्यात आली.

**सामनेवाला क्र.१ व २ तर्फे वकिल बोठे साहेब हजर नसल्याने उलटतपास काही नाही.**

**<u>उलटतपास सामनेवाला क्र.३ तर्फे एस. आर. जाधव वकिल साहेब</u> -**

हे बरोबर की, अर्ज समजुन व वाचुन त्यावर सही केली. हे बरोबर की, अपघातामध्ये जीवीतहानी झाली नव्हती. हे बरोबर की, कलम १४ क मध्ये मयताचे वय १७ वर्षे होते असे नमुद केले आहे. अपघाताच्या वेळी मोटारसायकल शौकत हवालदार चालवित होते. मोटारसायकल क्रमांक मला सांगता येणार नाही. मोटारसायकल आर टी ओ कडे कोणाच्या नावे नोंदवली होती याबाबत मला माहित नाही. हे बरोबर की, मोटारसायकल क्र.एम एच १६ सी एम ३२०५ वर मी पहील्यांदाच शौकत सोबत बसलो होतो. सदर मोटारसायकल कोणाच्या मालकीची होती याबाबत मला माहित नाही. हे बरोबर की, मोटारसायकल चालवण्यासाठी आर टी ओ परवाना लागतो. हे बरोबर नाही की, शौकतकडे मोटारसायकल चालवण्याचा परवाना नव्हता. माझे राहण्याचे ठिकाण आने आहे. आने ते लोणीमावळा चे अंतर मला सांगता येणार नाही. आने ते टाकळी ढोकेश्वरचे अंतर अंदाजे २० कि.मी. आहे. हे मला सांगता येणार नाही की, घटनेनंतर आधी मला पारनेर ग्रामीण रूग्णालय येथे भरती केले. हे मला सांगता येणार नाही की, शौकतला माझेसोबत भरती केले होते. दि.२३.०१.२०२१ रोजी मला साई एशिअन मध्ये भरती केले होते. साई एशिअन मध्ये मी अंदाजे १० दिवस भरती होतो. साई एशिअन मध्ये भरती असताना मी स्वत: पोलीस किंवा वैदयकीय अधिकरीला अपघाताची तक्रार दिली नाही. मी अपघात झाल्यानंतर दोन तीन दिवस बेशुध्द होतो. हे बरोबर नाही की, बेशुध्द अवस्थेमुळे मला कोणी आणि कोणत्या वाहनाने धडक दिली याची माहिती नव्हती. हे बरोबर नाही की, शौकत मोटारसायकल भरधाव वेगाने चालवित होता आणि अज्ञात वाहनाला

त्याने धडक दिल्यामुळे शौकतच्या चुकीमुळे अपघात झाला आहे. हे बरोबर नाही की, महिंद्रा पीकअप गाडी मालक आणि ड्रायव्हर विरुध्द खोटा क्लेम केला आहे. हे बरोबर नाही की, मी खोटे सांगतो की, सामनेवाला क्र.२ ने त्याच्या ताब्यातील वाहनाने रॉंग साईडला येवुन समोरुन जोराची धडक दिली.

हे बरोबर की, मी न्यायालयात काठी किंवा वाकर घेवुन आलो नाही. हे बरोबर नाही की, साई एशिअन मधुन डिस्चार्ज मिळाल्यानंतर मी कोणत्याही दवाखान्यातुन सध्या उपचार घेत नाही. हे बरोबर नाही की, माझे शरीरावरील सर्व जखमा ब-या झाल्यामुळे डॉक्टरांनी मला डिस्चार्ज दिला. हे बरोबर नाही की, सर्व जखमा ब-या झाल्या असुन मला कायमचे अपंगत्व राहीले नाही. हे बरोबर नाही की, मी वैदयकीय बील आणि औषधांच्या बीलांबाबत चुकीची मागणी केली आहे.

अपघाताच्या वेळी माझे वय १८ वर्षे होते. जनरल स्टोअर वडीलांच्या नावे आहे. हे बरोबर नाही की, कोणतेही दुकान चालवण्यासाठी शॉप ॲक्ट परवाना आणि ग्रामपंचायतची परवानगी लागते. हे बरोबर नाही की, मी खोटे सांगतो की, मी उत्कर्ष जनरल स्टोअर या नावाने व्यवसाय करुन प्रतिमहा २० ते २५ हजार रुपये उत्पन्न घेतो. हे बरोबर नाही की, महिंद्रा पीकअप चे मालकाविरुध्द खोटा क्लेम दाखल केला. हे बरोबर नाही की, अपघातामध्ये सामनेवाला क्र.२ ड्रायव्हरची कोणतीही चुक नाही. हे बरोबर नाही की, नुकसान भरपाई मिळवण्याकरीता खोटे शपथपत्र दाखल केले. हे बरोबर नाही की, सामनेवाला क्र.३ विरुध्द खोटा क्लेम दाखल केला.

**उलटतपास पुर्ण**

श्रवणोत्तर स्वीकृत.

समक्ष

**(महेश सि. तिवारी)**
सदस्य, मोटार अपघात प्राधिकरण,
अहमदनगर.

**(महेश सि. तिवारी)**
सदस्य, मोटार अपघात प्राधिकरण,
अहमदनगर.

दिनांक : १८.१०.२०२४